संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ६१ वा ● ● सोमवार दि. ११ सप्टेंबर २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025


एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी
डॉ.सौ. चैताली सप्तेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. सप्तेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M..S.)
उपलब्ध सुविधा
* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

# गावा-गावात काँग्रेसच्या विचारांचा कार्यकर्ता

## डॉ. विश्वजीत कदम : भाजपनकडून जाती-जातीत तेढ निर्माण करण्याचे काम सुरु

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/धिरज प्रक्षाळे :** राज्यात देशात सत्ता नसली तरी,गावागावात काँग्रेसच्या विचारांचा कार्यकर्ता आहे. राज्यातील पोटनिवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाने चांगली कामगिरी केली आहे. देशात महागाई वाढली असून,जाती-जाती मध्ये जाणीवपूर्वक तेढ निर्माण करायचे, शेतकऱ्यांच्यावर लाठीचार्ज करायचा, काँग्रेसने पारित केलेला कायदा हुकुमशाही पद्धतीने लागू केला. त्यामुळेचा पंजाबमध्ये एक सुद्धा आमदार भाजपचा आला नाही. देशातील जनतेला त्यामुळे भाजपला नाकारले आहे. कोरोना काळात महाविकास आघाडी सरकार चांगले काम करत असताना ते सरकार पाडण्याचे काम भाजपने केले असल्याची टीका आरोप माजी राज्यमंत्री डॉ.विश्वजित कदम यांनी केली.



**खरसुंडी : येथे जनसवांद पदयात्रेच्या सभेमध्ये बोलताना डॉ. विश्वजीत कदम २) नेलकरंजी ते खरसुंडी पदयात्रेमध्ये चालत असताना डॉ. विश्वजीत कदम, विशाल पाटील, जितेश कदम, अशोक गायकवाड व मान्यवर**

नेलकरंजी ते खरसुंडी अशी पदयात्रा काढण्यात आली. खरसुंडी येथे पदयात्रा आल्यानंतर येथे आयोजित सभेत माजी मंत्री डॉ. विश्वजित कदम बोलत होते. यावेळी युवा नेते विशाल पाटील, युवा नेते डॉ.जितेश कदम, अशोकराव गायकवाड, आटपाडी तालुका काँग्रेस क्सचे अध्यक्ष जयदीप भोसले, संभाजी जाधव, मजूर फेडरेशनचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासो भोसले, जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष शशिकांत देठे, बाजार समितीचे सभापती संतोष पुजारी, उपसभापती राहुल गायकवाड, संचालक भगवान पाटील यांच्या सह कॉंगेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, सध्या राज्यातील इतर राजकीय पक्षांचे तुकडे करायचे व राजकारण करायचे काम भाजपने चालू केले असल्याने, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील 'अ' टीम कोणती व 'ब' टीम कोणती हे अजून कळालेच नाही अशी खोचक टीका देखील त्यांनी भाजपवर केली. ज्या भगिनींनी देशाला मेडल मिळवून दिले, त्या भगिनींना आंदोलन करत असताना त्यांना तेथील पोलिसांकरवी उचलून नेण्याचे काम केले असून महिलांचा अपमान केलेल्यांना देश कधी माफ करणार नसल्याचे भाजपवाल्यांनी लक्षात ठेवावे असे खडे बोल देखील सुनवले.

काँग्रेसचे युवा नेते विशाल पाटील म्हणाले की, सध्या निवडणुका जवळ येत असल्यानेच खासदार तुमच्या बांधावर येत असून विचारपूस करत असून खांदयावर हात टाकून कधी पाकीट हे सांगता येत नसल्याची टीका करत, दुसऱ्यांनी केलेल्या कामाचे श्रेय घेण्याचे काम केले जात असल्याचा आरोप विशाल पाटील यांनी खासदार संजय पाटील यांचे नाव न घेता केला. मागील लोकसभा निवडणुकीमध्ये आम्ही कमी पडलो म्हणूनच तुम्ही दुसऱ्याला निवडून दिले.मात्र यापुढे आम्ही कमी पडणार नाही.अशी ग्वाही देखील विशाल पाटील यांनी दिली.

यावेळी डॉ. जितेश कदम, अशोक गायकवाड, जयदीप भोसले, अरुण वाघमारे, राहुल गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास माजी पंचायत समिती सदस्या सारिका भिसे, खादी ग्रामोद्योगचे चेअरमन अरुण वाघमारे, बाजार समितीचे माजी संचालक विजय पुजारी, शिवसेना नेते रमेश कातुरे, माजी तालुकाध्यक्ष डी.एम. पाटील, हणमंत गायकवाड, मोहन खरात, विलास शिंदे आदि मान्यवर उपस्थित होते.

# दिघंचीत म्हैस चोरीला

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**दिघंची :** आटपाडी तालुक्यातील दिघंची येथे दावणीला बांधलेली म्हैस अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली असल्याची फिर्यादी दिघंची येथील विकास अण्णासो मोरे यांनी आटपाडी पोलिसात दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, विकास मोरे हे दिघंची येथे राहण्यास आहेत. त्यांनी त्यांची महीसाना जातीची म्हैस दिघंची येथील स्मशानभूमी जवळील त्यांच्या शेतामध्ये मोकळ्या जागेत बांधली होती. परंतु दिनांक ७ रोजी रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी म्हैस चोरून नेली आहे.

भाऊ कन्स्ट्रक्शन
बिल्डर्स & डेव्हलपर्स
9004792356
- उत्कृष्ट.दर्जेदार आणि मजबूत पद्धतीचे कामे.
- सर्वांच्या पसंतीत आणि विश्वासात नं.१ चे स्थान असलेले.

## दोन नंबरवाले बिनधास्त ओढतात वाळू,प्रशासकीय अधिकारी लोण्यासाठी शोधतात सर्वसामान्य शेतकऱ्यांची टाळू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**निंबवडे/वार्ताहर :** आटपाडी तालुक्यातील, निंबवडे ओढा पात्रातून राजरोसपणे वाळू उपसा चालू आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांचे याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करत आहेत. ओढा पात्रातील वाळू उपशामुळे ओढा पात्रा शेजारील सर्व विहिरी कोरड्या पडल्या आहेत. वाळू माफियानी जेसीबीच्या साह्याने मोठ-मोठे खड्डे पाडल्या मुळे टेंभू योजनेचे पाणी शेवटच्या टोकापर्यंत येतच नाही.

वाळू उपशामुळे पाण्याचं पाझरत नसल्याने शेतकरी पण हवालदिल झाले आहेत. शेतकऱ्यांनी तक्रार केली तर अधिकारी तेवढ्यापुरतेच कडक भूमिका घेतात आणि स्वतःचा खिसा भरून त्यांना पुन्हा वाळू उपशासाठी मोकळीक देतात, यातून बऱ्याच

> मागील आठवड्यात एका वाळू माफियाची गाडी निंबवडे पुला जवळ चाक रुतल्यामुळे फसली होती. त्याने तिथंच गाडीतील वाळू खाली करून संध्याकाळी परत तिथूनच अगदी बिनदास्तपणे भरून घेऊन गेला. बारा तास वाळूचा ढिग रस्त्याकडेला पडून होता. पण एकही प्रशासकीय अधिकारी तिकडे फिरकला सुद्धा नाही.

शेतकऱ्यांना वाळू माफिया कडून दमदाटी झाली आहे. त्यामुळे हल्ली शेतकरी पण तक्रारी साठी पुढे येत नाहीत.

एक तर पाऊस नाही आणि टेंभू योजनेचे पाणी आले तरी वाळू उपशामुळे ते विहिरी नाही अशा दुहेरी संकटात शेतकऱ्यांना तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करावा लागत आहेत.

# आज म्हसवडमध्ये विविध विकास कामांचे उद्घाटन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/अहमद मुल्ला :** आमदार जयकुमार गोरे यांच्या प्रयत्नातून म्हसवड शहराचा कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावणारी एकूण ८० कोटीची रुपयांची म्हसवड नळ पाणीपुरवठा योजना व शहरातील अंतर्गत रस्ते, गटर तसेच अहिल्याबाई होळकर शॉपिंग कॉम्प्लेक्स, महात्मा ज्योतिबा फुले चौक सोशोभीकरण आदी कामांचा भूमिपूजन सोहळा समारंभ आज दिनांक ११ रोजी रोजी सायंकाळी महसूल व पशुसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन या मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार असल्याची माहिती माजी नगराध्यक्ष विजयकुमार धट यांनी दिली.



राधाकृष्ण विखे-पाटील



जयकुमार गोरे

पुढे बोलताना ते म्हणाले, विकास कामांचे उद्धाटन संपन्न झाल्यावर, जाहीर सभा होणार असून याच सभेत महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हसवडला तालुका जाहीर करणार आहेत. येत्या तीन-चार महिन्यानंतर तहसील कार्यालय, प्रांत कार्यालय, रजिस्टर ऑफिस व सिटी सर्व्हे ऑफिस म्हसवड शहरा मध्ये होणार आहे.

म्हसवड नगरपरिषद हद्दीत उद्यम नगर क्रमांक एक अंतर्गत रस्ते व गटार बांधकाम करणे तसेच सातारा पंढरपूर रोड अप्रोच ते मरीआई मंदिर रस्ता डांबरीकरण करणे. बनगरवाडी बेघर वसाहत अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण करणे. मल्हार नगर अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण करणे. सातारा पंढरपूर अप्रोच ते मेरी माता हायस्कूल रस्ता डांबरीकरण करणे. म्हसवड नगर परिषद हद्दीतील वीरकरवाडी देवापुर अप्रोच राखुंडे वस्ती रस्ता डांबरीकरण करणे. अहिल्याबाई होळकर शॉपिंग कॉम्प्लेक्स उभे करणे. दहिवडे मळा ते नागोबा मंदिर रस्ता डांबरीकरण करणे. राऊतवाडी रस्ता डांबरी करण करणे. लांब मळा रस्ता डांबरीकरण करणे. दहिवडी मळा ते नागोबा रस्ता भाग क्रमांक दोन डांबरीकरण करणे बनगरवाडी रस्ता डांबरीकरण. सातारा पंढरपूर अप्रोच विरकर मळवी रस्ता डांबरीकरण करणे. पंतवस्ती अंतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे अशी सात कोटी ७५ लाख ५८ हजार ६८१ रुपयांच्या कामाची भूमिपूजन व इतर १३ कोटी रुपयांचे भूमिपूजन होणार आहेत.

तरी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी बाजार पटांगण म्हसवड येथे माता भगिनी तरुण तसेच सर्व कार्यकर्ते व म्हसवडकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन माजी नगरसेवक विजयकुमार धट यांनी केले आहे.



## संपादकिय

### मराठा आरक्षणाचा तिढा कसा सोडवणार

जालना येथे मनोज जरांगे-पाटील हे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून आमरण उपोषण सुरु असून जो पर्यंत आरक्षण मिळत नाही, तो पर्यंत उपोषणावर ठाम असल्याने सरकार मराठा आरक्षणाचा तिढा कसा सोडवणार असा प्रश्न राज्यात निर्माण झाला आहे. पोलिसांनी आंदोलकांवर लाठीमार केल्यावर त्यांच्या उपोषणाला मोठी प्रसिद्धी मिळालीच. पण सत्ताधारी व विरोधी पक्षांतील नेत्यांची त्यांना भेटण्यासाठी रिघ लागली. शरद पवार, राज ठाकरे आदी विरोधी नेत्यांनी त्यांची भेट घेतली. गिरीश महाजन, अर्जुन खोतकर, नितेश राणे आदी सत्ताधारी नेत्यांनी त्यांची समजूत घालण्याचा बराच प्रयत्न केला. पण ते आपल्या मागण्यांशी ठाम राहिले व उपोषण चालूच ठेवले. पाहिजे तसा जीआर जरांगे यांनी काढायला लावलाच, पण नंतर नव्या अटी लादून सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळाले पाहिजे, असा आग्रह त्यांनी धरला.

जालनातील लाठीमाराच्या घटनेनंतर मराठा समाजाच्या विविध संघटनांनी राज्यात ठिकठिकाणी आंदोलने केली. अनेक ठिकाणी रस्ता रोको, बंद पाळले गेले. रस्त्यावर येऊन निषेध प्रकट झाले. जाळपोळ झाली. एसटीच्या बसेस व खासगी वाहने जाळली गेली. एक मराठा, लाख मराठा अशी घोषणा देत फडणवीसांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी झाली, काही ठिकाणी अजितदादांनी सरकारमधून बाहेर पडावे अशीही मागणी झाली. अनेक जिल्ह्यांत तीन-तीन दिवस बस वाहतूक बंद होती. या सर्व नुकसानीची जबाबदारी घेण्यास कोणीच पुढे आले नाही. मनोज जरांगे यांची मागणी मान्य करून राज्य सरकारने मंत्रिमंडळाची तातडीने बैठक घेऊन एक दिवसात जीआर काढला. त्यात म्हटले आहे, मराठा समाजातील ज्या व्यक्तींनी मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीच्या जात प्रमाणपत्राची मागणी केली आहे, अशा व्यक्तींनी सादर केलेल्या निजामशाहीतील महसुली अभिलेखात, शैक्षणिक अभिलेखात जर त्यांच्या वंशावळीचा उल्लेख कुणबी असा असेल, तर अशा व्यक्तींनी सादर केलेल्या पुराव्याची काटेकोर तपासणी करून त्यांना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यास शासन मान्यता देत आहे. खरं तर अशा जीआरनंतर मनोज जरांगे उपोषण मागे घेतील, असे सर्वांना वाटले होते. पण त्यांनी म्हटले, 'केवळ मराठवाड्यातील मराठ्यांना नव्हे तर महाराष्ट्रातील मराठ्यांना आरक्षण देता येईल', एवढे पुरावे आमच्याकडे उपलब्ध आहेत. हैदराबादपासून मुंबईपर्यंत आम्ही पुरावे गोळा केले आहेत. सरकारने केवळ वटहुकूम काढण्याची गरज आहे. जरांगे-पाटील आता म्हणत आहेत, सरकारच्या जीआरचा काहीही उपयोग नाही. निजामाच्या दस्तऐवजात कुणबी असल्याचा उल्लेख असलेल्या व्यक्तींना कुणबी जात प्रमाणपत्र सरकार देणार आहे. पण असे दस्तऐवजच आमच्याकडे नाहीत. कुणबी म्हणून निजामकालीन नोंदी असलेले १९४८ पूर्वीचे कागद सापडणे कठीणच आहे आणि जात प्रमाणपत्रासाठी तोच मोठा अडथळा आहे. वंशावळीची नोंदच मिळत नसेल, तर कुणबी प्रमाणपत्र मिळणार नाही हाच त्याचा अर्थ आहे. म्हणूनच जीआरमधून वंशावळीचा उल्लेख काढून टाका, अशी मागणी जरांगे-पाटील करू लागले आहेत.त्यामुळे मराठा आरक्षणाचा पेच कसा सोडवायचा हा प्रश्न सध्या सरकारपुढे निर्माण झाला आहे.

# स्त्री पुरुष समानता जाणीव जागृती अभियान संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**कोळे/प्रतिनिधी :** समाजामध्ये स्त्री पुरुष समानता निर्माण व्हावी, बाल विवाह विरोधी वातावरण निर्माण व्हावे या उद्देशाने १ सप्टेंबर ते १० सप्टेंबर या दरम्यान आंबेडकर शेती विकास व संशोधन संस्था, निर्माण संस्था व मैत्री नेटवर्क यांच्या संयुक्त विद्यमाने सांगोला तालुक्यातील विविध गावात स्त्री पुरुष समानता अभियान राबवले गेले असल्याची माहिती या अभियानाच्या समन्वयक शर्मिला केदार यांनी दिली.

निर्माण संस्था पुणे आणि मैत्री नेटवर्क च्या सहकार्याने डॉ. आंबेडकर शेती विकास व संशोधन संस्था स्त्री पुरुष समानता आणि हिंसामुक्त समाज निर्मितीसाठी समाजातील विविध गटा सोबत काम करत आहे. किशोरवयीन मुले, महिला-पुरुष, तसेच गाव पातळीवरील विविध संस्था संघटना यांना घेऊन हे अभियान राबवले जात आहे. या अभियानाच्या माध्यमातून विविध जाणीव जागृती कार्यक्रम, चित्रपट, सह्यांची मोहीम, पोस्टर प्रदर्शन, शालेय मुलांच्या गावातून जाणीव जागृती फेरी, खेळ आणि चित्रकला स्पर्धा आदी कार्यक्रम राबवले जात आहेत. सांगोला तालुक्यातील सोनंद, डोंगरगाव, मानेगाव, निजामपूर, घेरडी, एखतपूर, लोनविरे, हातीद या गावात विविध घटकांसोबत वरील कार्यक्रम राबवले जात असून या कार्यक्रमाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जाणीव जागृती होत आहे. समाजातील स्त्री पुरुषांसोबत संवाद साधून समानता, घरचे काम सर्वांचे, आणि हिंसामुक्त समाज निर्मितीची जाणीव जागृती करण्यात येत आहे. शालेय विद्यार्थ्यांसोबत सामजिक विषयावरती चित्रकला आणि निबंध स्पर्धा घेऊन स्त्री पुरुष समानता, बाल विवाह भूमिका , महिला हिंसा या विषयावर समज वाढवण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे. प्रत्येक गावातील मुला-मुलीनी या स्पर्धेत भाग घेऊन वरील विषयांवर चित्रे आणि निबंध लिहून समाजामध्ये जागृती केली आहे. गावामधून महिला हिंसा, बाल विवाहामुळे मुलींचे होणारे नुकसान या विषयावर गाव बैठका घेण्यात आल्या असून या बैठकांच्या माध्यमातून स्त्री पुरुष समानता समाजात रुजवण्यासाठी प्रतिज्ञा घेतली. आम्ही सर्व समानतेसाठी महिलांच्या सन्मानासाठी, मुलगा मुलगी एक समान, करा दोघांचा हि सन्मान, मुलगा-मुलगी भेद नको, मुलींचे शिक्षण प्रगतीचे लक्षण, बाल विवाह थांबलाच पाहिजे, बाल विवाह नको शिक्षण हवे, लिंगभेद विकासाला छेद, चला भेदभाव दूर करू महिलांचा सन्मान करू घरचे काम सर्वांचे काम आदी घोषणा देत शालेय विद्यार्थांनी या जाणीव जागृती अभियानास हातभार लावला आहे. मुलांनी काढलेली चित्रे व महिला हिंसा, बाल विवाह, स्त्री पुरुष समानता या पोस्टर चे प्रदर्शन गावातून आयोजित करण्यात आले. तसेच गावागावांमध्ये स्त्री पुरुष समानतेसाठी सह्यांची मोहीम राबवण्यात आली.



सांगोला : स्त्री पुरुष समानता बाबत हायस्कूलच्या विद्यार्थीनी काढलेली फेरी

सांगोला पोलीस स्टेशन मध्ये हि या जाणीव जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी तसेच सर्व महिला पुरुष पोलीस कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब ठोकळे उपस्थित होते. सदर अभियान समाजातील हिंसा रोखण्यासाठी आणि बालविवाह थांबण्यासाठी अतिशय महत्वपूर्ण भूमिका बजावेल असे पोलीस निरीक्षक कुलकर्णी यांनी सांगितले व या अभियानाचे कौतुक केले आहे.

सांगोला एस टी स्थानकात हि या अभियानाचे पोस्टर प्रदर्शन व सह्यांची मोहीम आयोजित करण्यात आली. दिवसभर चाललेल्या अभियानाच्या माध्यमातून हजारो लोकांची जाणीव जागृती करण्यात आली आहे. यावेळी आगार प्रमुख नदाफ यांनी मोलाचे सहकार्य केले आहे. सदर अभियान यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर ठोकळे, अनिल जगधने, सुरेश बाबर, खंडेराव लांडगे, विराज लांडगे यांनी परिश्रम घेतले.

# खंडाळ्यातील युवकाची शिंगणापुरात आत्महत्या

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**म्हसवड/प्रतिनिधी :** पारगाव खंडाळा येथील युवकाने शिखर शिंगणापूर याठिकाणी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. गणेश बाळू ओतारी (वय-२५) असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव असून आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नाही.

याबाबत शिंगणापूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिंगणापूर येथील विश्रामगृह परिसरातील झाडाला एका अज्ञात युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे स्थानिकांच्या निदर्शनास आले.स्थानिकांनी याबाबतची खबर शिंगणापूर पोलिसांना दिली. त्यानंतर शिंगणापूर पोलीस व पोलीस पाटील यांनी अधिक माहिती घेतली असता हा युवक पारगाव खंडाळा येथील असून त्याचे नाव गणेश बाळू ओतारी असल्याचे समजले. शिंगणापूर येथील मंदिर परिसरातील एका हॉटेलमध्ये हा युवक आठ दिवसांपासून वेटरचे काम करत होता.आत्महत्येचे कारण समजू शकले नसून आकस्मित मृत्यूची नोंद शिंगणापूर पोलिसांत झाली आहे.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी जिंकले जग : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**मुंबई :** जी - २० शिखर परिषदेच्या निमित्ताने जगभरातील देशांचे प्रमुख, राष्ट्राध्यक्ष भारतात एकाचवेळी एकाच व्यासपीठावर आले. यातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जग जिंकले अशी भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. नवी दिल्ली येथे झालेल्या या ऐतिहासिक शिखर परिषदेत सहभागी होता आले ही अभिमानाची बाब असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताचा गतीने विकास होत आहे. देशाची अर्थव्यवस्था दहाव्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकावर आली. कालच्या शिखर परिषदेतील भारावलेले वातावरण पाहून भारत महासत्तेकडे वाटचाल करीत असल्याचा अनुभव आल्याची भावना देखील मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.



भारतात एकाच वेळी अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी या युरोपियन तसेच आफ्रिकन देशांचे राष्ट्राध्यक्ष सहभागी झाले होते, ही उल्लेखनीय बाब आहे, ही कामगिरी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यामुळे शक्य झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या शिखर परिषदेत प्रधानमंत्र्यांनी मांडलेला न्यू दिल्ली जी -२० लीडर्स समिट डिक्लरेशनवर एकमत झाले. जी - २० समूहाने उत्स्फूर्तपणे स्वागत केले. हे आपले मोठे राजनैतिक यश आहे. स्वच्छ इंधनाच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी भारताने जी २० शिखर परिषदेत 'ग्लोबल बायोफ्युएल अलायन्स'ची घोषणा केली आहे. त्याचा वापर वाढला, तर जगाचे पारंपारिक इंधन पेट्रोल आणि डिझेलवरील अवलंबित्व कमी होईल आणि पर्यावरणाचे प्रदूषणही कमी होईल. याच परिषदेत 'इंडिया-मिडल ईस्ट-युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर' (खचएउ) सुरू करण्याची घोषणा करण्यात आली हे ऐतिहासिक आणि गेमचेंजर पाऊल असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

या इकॉनॉमिक कॉरिडॉरच्या माध्यमातून आशियापासून मध्य पूर्व आणि युरोपपर्यंतचा व्यापार अधिक सुलभ होईल. आपल्या देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल आणि तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याचे भारताचा स्वप्न लवकरच साकार होईल, असेही श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

# जिल्ह्यातील ४६ बालकांवर होणार मोफत हृदय शस्त्रक्रिया

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**सांगली :** आयुष्यमान भव योजनेंतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमामधून जिल्ह्यातील ४६ बालकांवर मोफत हृदय शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. एस.आर.सी.सी. रुग्णालय, मुंबई येथे या बालकांवर हृदय शस्त्रक्रिया होणार आहेत. बालकांच्या हृदय शस्त्रक्रिया, औषधोपचार, निवास, भोजन व्यवस्था या सर्व सोयी शासन मोफत करत आहे. त्यामुळे कोणीही चिंता करू नये. सर्व बालकांच्यावर शस्त्रक्रिया यशस्वी होवून ती तंदुरूस्त होवून येतील असा दिलासा देवून पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी बालक व पालकांना शुभेच्छा दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालय येथून पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या उपस्थितीत हृदय शस्त्रक्रिया करण्यासाठी बालकांना स्वतंत्र बसने मुंबईकडे पाठविण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी दिपक शिंदे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विभीषण सारंगकर, जिल्हा कार्यक्रम समन्वयक डॉ. प्रमोद चौधरी,




कार्यक्रम सहायक अनिता हसबनीस, व्यवस्थापक कविता पाटील तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचे वैद्यकीय अधिकारी आदी उपस्थित होते.







दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






## निवडणुका आल्याने खासदार लागले फिरू : विशाल पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** सध्या निवडणुकाचा हंगाम सुरु असून गेली पाच वर्ष कधीही न फिरणारे खासदार आता फिरू लागले असून अनेकांच्या खांद्यावरती ते हात टाकत फिरत असून कधी त्यांचे पाकीट मारतील हे कळणार देखील नाही, अशी टीका काँग्रेसचे युवा नेते विशाल पाटील यांनी खास. संजयकाका पाटील यांच्यावर नाव न घेता केली. ते आटपाडी तालुक्यात काँग्रेसच्या वतीने काढण्यात आलेल्या जनसंवांद पदयात्रेतील खरसुंडी येथे झालेल्या जाहीर सभेमध्ये बोलत होते.



खरसुंडी : येथील जनसंवाद सभेमध्ये बोलताना विशाल पाटील व समोर उपस्थित समुदाय

पुढे बोलताना ते म्हणाले, राहुल गांधी यांनी या देशामध्ये 'भारत जोडो' पदयात्रा काढली ती लोकांची अडी-अडचणी एकूण घेण्यासाठी काढली होती. परंतु सध्या देशाला जे नेतृत्व मिळाले आहे ते कुणाचे ऐकत नाही. फक्त बोलतय. आणि फक्त जो बोलतो तो लादतो. त्यांचे कान हे पूर्वीच कुणीतरी विकत घेतले आहेत. त्यामध्ये एक कान अडाणी आणि दुसरा कान अंबानीने विकत घेतला आहे. त्यामुळे यांना कुणाचे ऐकायला येत नाही. साडे नऊ वर्षात एकही पत्रकार परिषदेला सामोरे न जाणारे नेतृत्व म्हणून आपले पंतप्रधान यांची ओळख आहे.

सध्या लोकांच्या अडी-अडचणी या लोक त्यांच्या त्या सोडवण्यासाठी तयार असले तरी, त्यांचे कुणीतरी ऐकायला या एवढीच अपेक्षा आहे. पंतप्रधान दररोज येतात, पण टीव्हीवर येतात. क्रिकेट सामना असला तरी मोदी अन चंद्रयान असले तरी मोदीच दिसतात.परंतु सर्व सामान्य जनतेच्या घरापर्यंत जावून त्याचं ऐकून घेणारे फक्त राहुल गांधी होते. 'भारत जोडो' यात्रे दरम्यान लोकांच्या अडी-अडचणी त्यांनी लोकसभेमध्ये जावून त्यांच्या अडचणी मांडल्या. आजच्या पदयात्रेमध्ये ही विश्वजितकदम यांच्याकडे जावून लोकांनी आपल्या अडचणी मांडल्या.

पुढे बोलताना ते म्हणाले, कधी नाही ते खासदार खरसुंडी तसेच आटपाडी तालुक्यात आले होते. निवडणूक आले की, हौशी, गौशे, नवसे सगळी गोळा होतात. निवडणूक आल्याने पाकीटमार सगळ्यात पुढे असतात. निवडणूक असल्याने माझ्या खांद्यावर कुणीतरी हात टाकल्याने लय खुश झाली. परंतु नंतर बघितले तर, पाकीट गायब झाले आहे. तसे जिल्ह्यातील खासदार निवडणूक आल्याने सगळ्यांच्या खांद्यावर हात टाकत असून कधी तुमच्या खिशातील पाकीट कशी काढून नेईल अशी टीका करत, कारण दुसऱ्यांनी केलेल्या कामाचे श्रेय घेण्याची सवय त्यांना लागलेली असल्याचे ते म्हणाले.

पाण्याच्या आवर्तनाचा आणि खासदाराचा काहीही संबंध नाही ते राज्य सरकार ठरविते. खासदारांनी ज्या योजना अर्धवट राहिल्या आहेत त्यांना निधी आणण्यासाठी काम केले पाहिजे. परंतु आपले खासदार हे दिल्लीत फिरकत नाहीत, संसदेत किती प्रश्न मांडले, किती वेळा बोलले, एक हि गोष्ट ते आपल्यासाठी करू शकले नाहीत. खरसुंडी गावामध्ये नऊ वर्षात एक काम दिले, परंतु देवापेक्षा मोठे नाव त्यांनी त्या ठिकाणी लावले असल्याची टीका देखील त्यांनी केली.

आटपाडी सारख्या दुष्काळी तालुक्याला न्याय देण्याचे काम स्व. पतंगराव कदम साहेबांनी केले असून यापुढे जिल्ह्यामध्ये ती जबाबदारी विश्वजित कदमांनी खांद्यावर घेतली असून येणाऱ्या काळात जिल्ह्यातील खासदार, आमदार हे विश्वजित कदम यांच्या विचारांचे निवडून येणार असल्याचे म्हणत, आटपाडी तालुक्यातील सर्व जमीन पाण्याखाली आणण्याची जबाबदारी हे विश्वजित कदम यांनी खांद्यावरत घेतली असून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये जितेश कदम हेच उमेदवार असतील असा संकेत देखील त्यांनी यावेळी उपस्थितीतांना दिला.

## नगरपंचायती हद्दीतील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नातेपुते/वार्ताहर :** माळशिरस तालुक्यातील असणाऱ्या चार नगरपंचायती मधील अकलूज, नातेपुते, माळशिरस, महाळुंग या नगरपंचायती हद्दीतील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करण्याबाबत २०१८ जीआर निघाला आहे. चार ही नगरपंचायतींमध्ये अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी नागरिकांनी अर्ज सादर केले आहेत. सदर अर्जाच्या अनुषंगाने मोजणी करणे गरजेचे असून नगरपंचायती हद्दीतील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करण्याची मागणी माळशिरस शिवसेना तालुका प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी केली आहे.



भूमी अभिलेख कार्यालय येथे निवेदन देताना, शिवसेना तालुका प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील व उपस्थित मान्यवर

राज्य सरकारच्या वतीने शासन आपल्या दारी हा उपक्रम राबवत आहे. या योजनेमध्ये अर्ज केलेल्या नागरिकांना त्यांची घरे नियमित करण्यासंदर्भात मोजणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे मोजणी करण्यात यावी अशी मागणी उपअधीक्षक नगर भूमापन कार्यालय माळशिरस यांच्याकडे करण्यात आली आहे. सोलापूर येथे होणाऱ्या शासन आपल्या दारी या कार्यक्रमात सर्व नगरपंचायतीमधील लाभार्थींना त्यांच्या घराच्या नोंदीचे दाखले देण्यात येणार आहेत. यासाठी तात्काळ समितीचे अध्यक्ष प्रांताधिकारी, सचिव नगरपंचायतींचे सीओ यांच्या बैठका घेऊन तात्काळ कार्यवाही पूर्ण करावी अशी विनंती ही राजकुमार हिवरकर पाटील यांनी केली आहे.

यावेळी विनायक सुर्वे, माऊली देशमुख, सागर साळुंखे, लखन आदमाने, राजू भरते, दत्तात्रय दीक्षित, सुहास देशमुख, सुनील देशमुख, सुरेश तवटे, अमोल नकाते, रमेश पंडित, विकास तारळकर, दादा इनामदार, कल्पेश खटावकर, जहांगीर मुलाणी आदि पदाधिकारी उपस्थित होते.




## आटपाडी बस स्थानकात रस्ता कमी, खड्डे जादा

### खड्ड्यात साचलेल्या पाण्यामुळे प्रवाशी त्रस्त : एस.टी.च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुका कायमस्वरूपी दुष्काळी तालुका म्हणून गणला जातो. याठिकाणी पर्जन्यमाना पेक्षा कमी पाऊस पडतो. त्यामुळे याचा फायदा या भागामध्ये काम करणारे सरकारी ठेकेदार घेत असल्याने निकृष्ट दर्जाची कामे होत आहेत. याचाच प्रत्यय आटपाडी बस स्थानक येथे पहावयास मिळत असून बस स्थानकात रस्ता कमी अन खड्डे जाता अशी परीस्थिती निर्माण झाली आहे.

बस स्थानकात ये-जा करणाऱ्या प्रवाशांना खड्यातील पाण्यातून प्रवास करावा लागला. खड्यातून बस स्थानकात गेल्यावर मात्र प्रवाशांना 'तीर मारून आल्याचा' भास होत होता.



आटपाडी : बस स्थानक येथे पावसाच्या पाण्याने बस स्थानकामध्ये साचलेले पाण्याचे तळे

मोठ्या प्रमाणात खड्यांनी स्थानकाला वेढा दिला असल्याने स्थानकाचा परिसर पावसाने जलमय झाला होता. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दुरूस्ती, डागडुगी, व खड्डे मुज्विण्याचे टेंडर काढून थातूर-मातूर दुरूस्ती केली गेली. ती प्रत्यक्षात कमी अन् कागदावरच जास्त होत असल्याचे झालेल्या कामावरून दिसून येते.विशेष म्हणजे मतदार संघामध्ये दोन तीन आमदार असून देखील हे चित्र कधी पालटणार अशी चर्चा प्रवाशी करीत आहे.

गेल्याच महिन्यात बस स्थानकात असणारे सर्व खड्डे मुजवून घेण्यात आले होते. खड्डे मुजवताना योग्य प्रकारे ते मुजवण्यात आले नसल्याने याप्रकरणी आगार प्रमुख यांच्याकडे तोंडी तक्रार देखील करण्यात आली होती. परंतु आपल्या घरचे काम नाही, असाच आविर्भाव आणत अधिकारी यांनी याकडे दुर्लक्ष करत करत ठेकेदाराचे एकप्रकारे समर्थनच केले. परंतु अधिकारी वर्गाने ठेकेदाराचे केलेले सर्मथन मात्र प्रवाशी वर्गाला भोगावे लागत आहे.




## धनगर आरक्षण अमंलबजवणीसाठी माळशिरस मध्ये आक्रोश मोर्चा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नातेपुते/वार्ताहर :** माळशिरस मधील अक्षदा मंगल कार्यालय या ठिकाणी सकल धनगर समाजाची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये एस.टी. आरक्षण अंमलबजावणी करण्यासाठी राज्यसरकारने तातडीने शिफारस केंद्र सरकारला करावी. आणि केंद्र सरकारने त्वरित अंमलबजावणी करून धनगर समाजाला राज्यघटनेने दिलेल्या एस.टी. आरक्षणाची स्वतंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानंतर तर अंमलबावणी करून धनगर समाजाला सामाजिक न्याय देण्याची भूमिका राज्य व केंद्र सरकारने घ्यावी. अन्यथा सकल धनगर समाज प्रस्थपिताना जागा दाखवल्या शिवाय राहणार नाही. त्याचबरोबर चौंडी याठिकणी सूरू असलेल्या समाज बांधवांच्या उपोषणास सुध्दा यावेळी समाजाच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. यावेळी माळशिरस तालुक्यातील सर्वपक्षीय नेते उपस्थित राहून एकमुखाने हा लढा तीव्र करण्याचे ठरवले आहे. या बैठकीत माजी आमदार रामहरी रूपनवर, उत्तमराव जानकर, सोमनाथ वाघमोडे, मारुती पाटील, गणपत वाघमोडे, रमेश पाटील, किशोर सुळ, लक्ष्मण हाके, बाळासाहेब सरगर, पांडुरंग वाघमोडे, सोपान नारनवर, रणजित सुळ, संजय वलेकर, संजय पाटील, नारायण देवकाते, शंकर शेंडगे सह आदी समाज बांधव उपस्थित होते. यावेळी तालुक्यातील सर्व समाज बांधवानी मोठ्या संख्येने १४ सप्टेंबरला सकाळी ९ वाजता उपस्थित राहण्याचे आवाहन सर्वांनी केले.






# स्वेरी फार्मसीच्या चार विद्यार्थ्यांची टी.सी.एस.सिग्मा या कंपनीत निवड

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पंढरपूर :** 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हीसेस सिग्मा तथा टी. सी. एस. सिग्मा' या नामांकित कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी मधील चार विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

फार्मसी क्षेत्राशी संबंधीत असलेल्या 'टी.सी.एस.सिग्मा' या नामांकित कंपनीच्या निवड समितीने अंतिम फेरीतून फार्मसी विभागातील दिव्या खंडू नवले, विश्वजीत राजकुमार पाटील, परवेज प्यारेलाल मुजावर व सिद्धेश्वर सुनील साखरे या ४ विद्यार्थ्यांची निवड केली आहे. क्लिनिकल डेटा व्यवस्थापन, फार्माकोव्हिजिलन्स, रेग्युलेटरी अफेअर्स, जनरल डोमेन अशा विविध विभागांसाठी ही निवड प्रक्रिया राबविण्यात आली होती.



**संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे, स्वेरी चिन्ह, फार्मसी चिन्ह व कंपनीत निवड झालेले विद्यार्थी अनुक्रमे दिव्या नवले, विश्वजीत पाटील, परवेज मुजावर व सिद्धेश्वर साखरे.**

स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रदीप जाधव तसेच स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी 'टी. सी. एस. सिग्मा' या कंपनीमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड झालेल्या चारही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# नातेपुतेत पार्किंगची व्यवस्था नसल्यामुळे अपघाताला निमंत्रण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नातेपुते/राजेंद्र पिसे :** नातेपुते शहरात दुचाकी, चारचाकी वाहनांची संख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. वाहने उभी करण्यासाठी पार्किंगची व्यवस्था नसल्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत असल्याने, त्यामुळे अपघात होण्याची दाठ शक्यता आहे. शहरातील मुख्य मार्गालगत रोडवर वाहने उभी केली जातात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो.शहरातील मुख्य भाग दहिगाव रोड, पुणे पंढरपूर रोड, नातेपुतेतील मेन बाजारपेठ परिसरात पार्किंगची व्यवस्था नसल्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. या बाबीचा फटका रस्त्यावरून पायी चालणारे नागरिक, शाळेकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांना होताना दिसून येत आहे.


**नातेपुते : येथे पार्किंगची सोय नसल्याने वाहन धारक आपली वाहने कुठे ही अस्ताव्यस्त लावत असल्याने वाहतुकीची कोंडी होत आहे.**

पार्किंगची सोय नसल्याची वाहनधारकातून संताप होत आहे. यावर तोडगा काढणे गरजेचे ठरत आहे. वाहन चालवताना चालकांना जीव मुठीत धरून अडचणींचा सामना करावा लागतोय. त्यामुळे प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी सर्वसामान्यांकडून होत आहे.

# देशमुख महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे खो-खो स्पर्धेत यश


**आटपाडी : जिल्हास्तरीय खो-खो- स्पर्धेसाठी निवड झालेला देशमुख महाविद्यालयाचा संघ**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय आटपाडी चा मुलांनी दणदणीत विजय संपादन केला. या विजयामुळे जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी संघाची निवड झाली.

श्रीमंत बाबासाहेब देशमुख हायस्कूल बनपुरी-तडवळे या ठिकाणी तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १९ वर्ष वयोगटातील खो-खो संघातील खेळाडूंनी प्रतिस्पर्ध्यासंघावरती मात करून प्रथम क्रमांक पटकाविला. या विजयामुळे संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

या विजयासाठी संस्थेचे चेअरमन अमरसिंह देशमुख, सचिव श्री पवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रा.शिवाजीराव भोसले, प्रा.डॉ. विजय लोंढे, ज्युनियर विभाग प्रमुख प्रा.संताजी लोखंडे, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गौरव चव्हाण, ज्यू क्रीडा शिक्षक प्रा. हणमंत माने तसेच सर्व प्राध्यापक वृंद व कर्मचारी यांनी यशस्वी खेळाडू यांचे अभिनंद करत त्यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# क्रांतिवीर शिक्षण संकुलाचे दुहेरी यश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/अहमद मुल्ला :** जिल्हास्तरीय आट्यापाट्या खेळ स्पर्धेत क्रांतिवीर शैक्षणिक संकुला अंतर्गतच्या क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवाडी शाळा म्हसवड च्या खेळाडूंनी दुहेरी यश संपादन केले.

जिल्हास्तरीय आट्यापाट्या स्पर्धा नुकत्याच दहिवडी येथे संपन्न झाल्या. जिल्हा क्रीडा अधिकारी सातारा व महात्मा गांधी विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज दहिवडी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय १४ वर्ष वयोगटा खालील मुले व मुली यांच्या आट्यापाट्या खेळ स्पर्धेचे आयोजन केले होते.या स्पर्धेत माण तालुक्यातील शाळा व विद्यालयाचे १६ संघ सहभागी झाले होते.


**म्हसवड : जिल्हास्तरीय आट्यापाट्या खेळ स्पर्धेत यश मिळविलेला क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी शाळेचे मुले व मुलींचा संघ**

अंतिम स्पर्धेत म्हसवड येथील क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी शाळेच्या मुले व मुली संघाने अत्यंत चमकदार खेळी करून विजेतेपद पटकावले. मुलाच्या संघाचे नेतृत्व आरमान मुल्ला तर मुलीच्या संघाचे पल्लवी पोळ हिने केले. कोल्हापूर विभागीय शालेय आट्यापाट्या स्पर्धा आगामी कालावधी मध्ये सांगली येथे होणार असून क्रांतिवीर संकुलातील दोन्ही संघ त्यामध्ये सहभागी होणार आहेत.

क्रीडा शिक्षक तुकाराम घाडगे,पांडुरंग भोसले,चंद्रकांत तोरणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सातारा जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर,क्रीडा अधिकारी सुनील कोळी, जिल्हा आट्यापाट्या असोसिएशनचे सचिव ज्ञानेश काळे, क्रांतिवीर संकुलाचे अध्यक्ष विश्वंभर बाबर, संस्था सचिव सुलोचना बाबर संकुलातील शिक्षक, पालक प्रतिनिधी यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले.

## जाहीर टेंडर नोटीस २०२२-२३

### सुचना क्र. १

**ग्रामपंचायत चिंचाळे ता-आटपाडी-जि-सांगली येथील खालील कामांसाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून मोहोरबंद निविदा ब-१ व दर पत्रक मागणी करारावर मागविनेत येत आहेत.तरी खालील नमूद केलेल्या कामानुसार दर्शविलेल्या तारखेच्या कालावधीमधील निविदा मागणी अर्ज दिलेनंतर निविदा फॉर्म कार्यालयीन वेळेत दिले जातील. मुदतीमध्ये आलेल्या निविदेचाच फक्त विचार केला जाईल.**

| अ.क्र | कामाचे नाव | लेखा शीर्षक | ज्या दर सूचीवर आधारित आहे ते वर्ष | कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | निविदा प्रकार | निविदा फार्म फी रक्कम रुपये | बयाना रक्कम रुपये १% | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख | भरलेल्या निविदा सिकृतीची तारीख व वेळ | कामाची मुदत | मक्तेदार प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे चिंचाळे ता. आटपाडी येथे घन कचरा व्यवस्थापन करणे. | SBM + १५ वित्त | २०२३-२४ | ५२०१५३/- | ब -१ | २००/- | ५२००/- | ११-९-२०२३ | २७-९-२०२३ वेळ ११.०० वाजे पर्यत | ३ महिने | सुभे |

**१) संपूर्ण भरलेली निविदा सांक्षाकिंत प्रतीसह दोन लिफाफा पध्दतीत सिलबंद लखोटयासह ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जमा करावे. लिफाफा क्र. १ मध्ये जि.प. नोंदणी प्रमाणपत्र, जी.एस.टी. प्रमाणपत्र, पॅन कार्ड व आयकर विवरण पत्र, अटी व शर्ती मान्य असलेचे हमीपत्र, कामाचा अनभुव दाखला, इ. सर्व कागदपत्रे असावित. २) लिफाफा क्र. २ मध्ये दरपत्रक सादर करावे. ३) प्राप्त निविदा दि. २९/९/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडणेत येईल. ४) उपरोक्त कामाचे बायाणा रक्कम डीडी जमा करावे. ५) उपरोक्त कामाचे बायाणा व कोऱ्या निविदा किंमत भरणा डी.सी.सी. बँक शाखा-चिंचाळे खाते क्र. ०८४०५०९०००००५ या खातेवर जमा करावे. सदर निविदा स्विकारणे अगर नाकारणेचा हक्क खाली सही करणार यांनी राखून ठेवलेला आहे. कामासंबंधीची सर्व माहिती कार्यालयीन वेळेत मिळेल.**

**ठिकाण:- ग्रामपंचायत चिंचाळे ता. आटपाडी**

XXX
**ग्रामसेवकग्रामपंचायत चिंचाळे**
**ता. आटपाडी जि. सांगली**

XXX
**सरपंच ग्रामपंचायत चिंचाळे**
**ता. आटपाडी जि. सांगली**




माणदेश एक्सप्रेस
व्यवसायिक जाहिरात योजना
आपल्या व्यवसायाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी दैनिक 'माणदेश एक्सप्रेस' ने आणली आहे अल्प दरात जाहिरात योजना आहे.
आटपाडी तालुक्यासह सांगली तसेच माणदेशातील अग्रगण्य दैनिक माणदेश एक्सप्रेस च्या माध्यमातुन आपली जाहिरात ५० हजार लोकपर्यंत पोहचवा.
10 X 5 cm ९०००/- रुपयात महिनाभर
10 X 10 cm २०००/- रुपयात महिनाभर
20 X 7 cm ३०००/- रुपयात महिनाभर
20 X 13 cm ४०००/- रुपयात महिनाभर
टीप : आतील पानासाठी हे दर १० टक्के कमी आहेत
याशिवाय विशेष स्किम, विविध योजांची माहिती देणाऱ्या बातम्यांना प्रसिद्धी दिली जाईल.
आजच संपर्क करा
९५९५०४७६७६, ९५०३६३८६८६

# हिंमत असेल तर चेअरमन पदाचा राजीनामा देऊन निवडणुकीला सामोरे जावे, पुन्हा निवडून आला तर जन्मभर गुलामी करेन : विश्वास पुजारी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** हिंमत असेल तर विनायक शिंदे यांनी, प्राथमिक शिक्षक बँकेच्या चेअरमन पदाचा राजीनामा देऊन निवडणुकीला सामोरे जावे, पुन्हा निवडून आला तर जन्मभर गुलामी करेन असे आव्हान शिक्षक संघाचे निष्टावंत कार्यकर्ते विश्वास पुजारी यांनी दिले.

मी संभाजीराव तात्यांच्या संघाचा सांगली जिल्ह्यातील संस्थापक सदस्य आहे. त्यामुळे शिक्षक संघातील हुकुमशाही व बेइमानी निष्ठावंत म्हणून अजिबात खपवून घेणार नाही. याआधी मी असल्या त्रासाला कंटाळून वेगळ्या भूमिका घेतल्या, परंतू या वाईट प्रवृत्ती मध्ये बदल होत नाही तेंव्हा इथून पुढे मी निडरपणे, संघातील तात्यांशी बेईमानी आणि कार्यकर्त्यांची लबाडी करणाऱ्या प्रवृत्तींना संपवण्यासाठी अखंड लढा चालू ठेवणार असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे निष्ठावंत कार्यकर्ते संभाजीराव थोरात यांचे निकटवर्तीय विश्वास पुजारी यांनी केले.

पुढे बोलताना ते म्हणाले, शिक्षक संघामध्ये दर तीन वर्षाला अधिवेशन घेऊन जिल्हा कार्यकारणी बदलणे अशी घटना आहे. तरीही सांगली जिल्ह्यामध्ये गेल्या अनेक वर्षांमध्ये अधिवेशन झाले नाही.व इतर कोणत्याही क्रियाशील कार्यकर्त्यांना संधी मिळाली नाही.अनेक वर्ष एकच जिल्हाध्यक्ष राहिल्याने त्यांची वागणूक हुकूमशाहीच्या दिशेने होत आहे, ही वस्तुस्थिती मी मांडलेली आहे.


**विश्वास पुजारी**

सभासदांनी अत्यंत विश्वासाने सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक बँक शिक्षक संघाच्या ताब्यात दिलेली आहे. पारदर्शक कारभार होण्याऐवजी बँकेमध्ये एकाधिकारशाहीने निर्णय होत आहेत याचा फटका आगामी निवडणुकीमध्ये शिक्षक संघाला बसेल. काळजीपोटी मी अनेकदा सल्ला देऊनही आम्हाला न जुमानता तुच्छ प्रकारे हिनवुन प्रत्येक गोष्ट मनासारखी करण्याकडे यांचा कल आहे. आपली बाजू मांडण्यासाठी खोटे बोलण्यापेक्षा बँकेचे पार्लमेंटरी बोर्ड जाहीर करावे, सल्लागार मंडळ जाहीर करावे, निवडणुकीमध्ये सोबत आलेल्या समविचारी संघटनांच्या प्रतिनिधींचे बँक कारभारातील योगदान जाहीर करावे. परंतु याच्यातील एकही गोष्ट चेअरमन महाशयांकडून होणार नाही. त्यामुळे त्यांनी झालेल्या आरोपांच्या नैराश्यातून मला आणि अत्यंत ज्येष्ठ आणि प्रामाणिक कार्यकर्ते सुरेश बापू खारकांडे यांची हकालपट्टी करून माथी पाप घेतलेले आहे.

शनिवारी मुठभर चमचे बहाद्दर कार्यकर्ते घेऊन जिल्हा संघाचा मेळावा एका खोलीमध्ये घेतला झाला. सांगली जिल्ह्यामध्ये असणारे राज्याचे पदाधिकारी यामध्ये राज्य कार्याध्यक्ष, महिला आघाडी राज्यअध्यक्षा यांना किंवा राज्यसंघातील कोणाशीही संपर्क न करता, संघनिष्ठ कार्यकर्त्यांना न बोलता त्यांनी हा मेळावा घेतलेला आहे. तेव्हा ही वाईट वृत्ती संपवण्यासाठी सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ बरखास्त करण्याची मागणी करणार असल्याचे विश्वास पुजारी यांनी सांगितले.

पुढे ते म्हणाले, आपण जर बँकेमध्ये चांगले काम केले आहे असे चेअरमन साहेबांना वाटत असेल तर त्यांनी आपल्यासह आपल्या सोबतच्या संचालकांसोबत राजीनामा पुन्हा हुकुमशाही प्रमाणे एकट्याने निवडणुकीला सामोरे जावे. आम्ही तुमच्या विरोधात सर्वसामान्य उमेदवार देऊन संघनिष्ठ कार्यकर्त्यांच्या बळावर लढा देऊ. जर आपण जिंकलात तर जन्मभर मी आपली गुलामगिरी करेल असे आवाहन पुजारी यांनी दिले.

मागील निवडणुकीमध्ये जत तालुक्यात आपल्या अतिशय जवळच्या मित्राला धोका देऊन त्यांना पराभवाच्या खाईत टाकून स्वतः निवडून आले. मागील निवडणुकीमध्ये सामान्य कार्यकर्ते अशोक मोटे या संघाच्या उमेदवाराला जातीपातीचे राजकारण करून पाडण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या लबाड कार्यकर्त्याला उमेदवारी दिली. तरीही त्या उमेदवाराला आटपाडीतून निवडून दिले. परंतु स्वभावातच लबाडी असणाऱ्या उमेदवाराने पुन्हा एकदा चमचेगिरी करून आटपाडी तालुक्यातील सभासदांना धोका दिला. निवडून आल्यावर आपल्या सोबतच्या कार्यकर्त्यांच्या मनामध्ये विष पेरण्याचे काम या बहाद्दराने सातत्याने चालू ठेवलेले आहे.याही उमेदवाराने पुन्हा एकदा निवडणूक लढवावी. तालुक्यातील सभासद आपल्याला काय प्रसाद देतील हे त्यांनी पहावे. या सर्व पार्श्वभूमीवर दिनांक १० सप्टेंबर रोजी बँक बचाव कृती समिती स्थापन करणारा असून सर्व चुकीच्या गोष्टी सभासदापुढे मांडणार असल्याचे विश्वास पुजारी यांनी सांगितले.